## नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०२०
## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१२८–२०२०

## निशाणी क्र.११४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी तर्फे कथन असे की, सदरहू दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द वाटपाकरिता दाखल केला आहे. सदरहू दाव्याचे कामी गंगू सिताराम धुरी उर्फ सुहासिनी सुहास इंगळे यास प्रतिवादी क्र.६ म्हणून सामील केलेले आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.६ हिचे पतीचे नाव चुकीचे नमूद केले आहे. प्रतिवादी क्र.६ हिचा मृत्यूदाखला हजर केला असता मृत्यू दाखल्यातील नाव व दाव्यातील नावात तफावत असल्याचे आढळले. तरी प्रतिवादी क्र.६ हिचे पतीचे नावात 'सुहास' ऐवजी 'सुभाष' असा बदल करुन 'गंगू सिताराम धुरी उर्फ सुहासिनी सुभाष इंगळे' अशी दाव्यात दुरुस्ती करणेची परवानगी मिळावी. सदर दुरुस्तीमुळे मूळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन विरोध दर्शवला आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

५. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.६ हिचे पतीचे नाव 'सुहास' ऐवजी 'सुभाष' असे आहे, तरी दाव्यात दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रस्तुत दाव्याचा न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपूर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्तवाच्या दृष्टीकोनातून

प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.११४ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.09.20 17:48:36 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड

दिनांकः २०/०९/२०२५